**कृपया प्रसिध्दिसाठी** **11 डिसेंबर 2008**

## चारकोप मेट्रो कारशेड रिकाम्या भूखंडातच बांधण्यात यावी- झोपडपट्टी बचाव समिती आणि जनप्रतिनिधींची मागणी

**मुंबई, गुरुवार :** चारकोप-वांद्रे-मानखुर्द मेट्रो रेल्वेच्या चारकोप येथे प्रस्तावित कार डेपोची जागा बदलून रिकाम्या भूखंडावरच कारशेड बनवावी अशी मागणी करणारे 5,149 कुटुंबियांचे निवेदन झोपडपट्टी बचाव समिती, कांदिवली (पश्चिम) च्या शिष्टमंडळाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त श्री. मिलिंद म्हैसकर यांना बुधवारी दिले. झोपडपट्टी बचाव समितीचे संयोजक श्री. बाबा सिंह यांच्यासह सर्वश्री संतोष राणे, डॉ. जी.एस्. यादव, सुरेश गुरव व शिवधनी प्रजापती शिष्टमंडळात होते.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने चारकोप कारशेडच्या जागेसंबंधी चर्चा करण्यासाठी माजी रेल्वे मंत्री व उत्तर मुंबईचे माजी खासदार श्री. राम नाईक, शिवसेना नेते व गोरेगावचे आमदार श्री. सुभाष देसाई, कांदिवलीचे इंदिरा कॉंग्रेसचे आमदार श्री. पी. यु. मेहता, तसेच भाजपा मुंबईचे अध्यक्ष व बोरिवलीचे आमदार श्री. गोपाळ शेट्टी यांची बैठक बोलविली होती. त्यावेळी झोपडपट्टी बचाव समितीचे प्रतिनिधीही उपस्थित होते.

चारकोप कारशेडच्या प्रस्तावित जागेच्या भूखंडामध्ये गणेश नगर, संजय नगर, लालजी पाडा, गांधी नगर, एकता नगर आणि जनता कॉलनी या झोपडपट्ट्या असून ही वस्ती 30 वर्षांपेक्षाही जुनी आहे. त्यामध्ये जवळ - जवळ 14 हजार कुटुंबे असून दोन हजार ते अडीच हजार छोटी दुकाने, लघुउद्योग, छोटे कारखाने, त्याचप्रमाणे 8 मान्यताप्राप्त शाळा, मंदीरे, मशिदी आणि चर्च आहेत. ही झोपडपट्टी वाचविण्यासाठी सर्व पक्षिय झोपडपट्टी बचाव समिती स्थापन झाली असून त्या समितीने वेळोवेळी सभा घेऊन तसेच हजारो कुटुंबीयांच्या स्वाक्ष-या घेऊन आपला विरोध नोंदविला आहे.

प्राधिकरणाच्या बैठकीत सध्या मोकळ्या असलेल्या भूखंडावरतीच कारशेड बांधण्यात यावी, असा आग्रह धरण्यात आला. तसेच या प्रकल्पाने बाधित होणा-या कुटुंबांच्या पुनर्वसनासंबंधी स्पष्ट धोरण जाहीर करण्यात यावे, मेट्रो रेल्वे स्टॅंडर्ड गेजची न बनवता ब्रॉड गेजची बनविण्यात यावी, तसेच मेट्रोचे भाडे हे सर्वसामान्यांना परवडणारे उपनगरी रेल्वे प्रमाणेच असावे आणि मासिक / त्रैमासिक पासचीही व्यवस्था करण्यात यावी, अशा मागण्या करण्यात आल्या.

बैठकीतील सदस्यांनी सुचविलेल्या भूखंडांची पाहणी करण्यात येईल, असे आश्वासन अतिरिक्त आयुक्त श्री. मिलिंद म्हैसकर यांनी दिले. तसेच बैठकीमध्ये करण्यात आलेल्या मागण्या महाराष्ट्र सरकारकडे योग्य त्या शिफारशींसह निर्णय घेण्यासाठी पाठविण्यात येतील असेही आश्वासन श्री. म्हैसकर यांनी दिले. महानगर आयुक्त श्री रत्नाकर गायकवाड हे आजारी असल्यामुळे बैठकीस हजर राहू शकले नाहीत.

**(बाबा सिंह)**
**संयोजक**
**मोबाईल क्र.**

**9323046896**